# <u>वार्तापत्र</u>

पोलीस अधीक्षक कार्यालय,
गडचिरोली. दिनांक ११/०४/२०१७

## *<u>पेरकाभट्टी जंगल परीसरात पोलीस-नक्षल चकमक</u>*

- **शस्त्रांसह मोठया प्रमाणात नक्षल साहीत्य जप्त**

काल दिनांक १०/०४/२०१७ रोजी उपविभाग जिमलगट्टा अंतर्गत उपपोस्टे देचलीपेटा हद्दीतील पेरकाभट्टी जंगल परीसरात विशेष अभियान पथक प्राणहीता नक्षल विरोधी अभियान राबवित असतांना रात्री ११.३० वा. च्या दरम्यान पोलीस-नक्षल चकमक झाली. पोलीसांनी आत्मसंरक्षणार्थ प्रत्युत्तरादाखल नक्षल्यांच्या दिशेने गोळीबार केला. दरम्यान पोलीसांचा वाढता दबाव पाहून नक्षलवादी आपल्या जवळील साहित्य घटनास्थळीच टाकून जंगलाचा फायदा घेवून पळून गेले.

चकमकीनंतर घटनास्थळाचा शोध घेतला असता पोलीसांनी घटनास्थळावरुन एक १२ बोर रायफल, दोन नग १२ बोर काडतुस, ०२ स्टील डब्बे भूसूरुग, वायर बंडल, सोलर प्लेट, कॅमेरा फ्लॅश, गन पावडर, पिट्टु, धारदार चाकू, रेडीओ, मेडीसीन व लिखीत साहित्य तसेच रोजच्या दैनंदिन वापराचे मोठया प्रमाणात नक्षल साहीत्य जप्त केले आहे.

नक्षलवादयांविरुध्द गुन्हा नोंद करण्यात आला आहे. तसेच सदर जंगल परिसरात नक्षलविरोधी अभियान तीव्र करण्यात आले आहे. दिनांक ०९/०४/२०१७ रोजी उपविभाग कुरखेडा अंतर्गत पोमके कोटगुल हद्दीत येणाऱ्या मौजा नाडेकल येथे झालेल्या चकमकीमध्ये ही पोलीसांनी मोठया प्रमाणात नक्षल साहीत्य जप्त केले आहे.



